
Process Safety Beacon
Messages for Manufacturing Personnel
www.aiche.org/ccps/process-safety-beacon

An AIChE Technology Alliance
CCPS
Center for Chemical Process Safety
aiche.org/ccps

This issue sponsored by
ioMosaic®
Minimizing risk. Maximizing potential.®
www.iomosaic.com

# आंतरराष्ट्रीय प्रक्रिया सुरक्षा सप्ताहाची घोषणा !!

नोव्हेंबर २०२४




जगभरातील प्रक्रिया सुरक्षा समुदाय २ ते ६ डिसेंबर २०२४ रोजी पहिला आंतरराष्ट्रीय प्रक्रिया सुरक्षा सप्ताह [IPSW] सादर करण्यासाठी एकत्र काम करत आहेत. प्रक्रियेच्या सुरक्षिततेसाठी अथक दक्षता आवश्यक आहे. IPSW चा उद्देश या दक्षतेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि भूतकाळातील महत्त्वाच्या घटना आणि शिकवणींचे स्मरण करून देण्यासाठी आहे. "प्रक्रिया सुरक्षा घटनांशिवाय जग" ("World without Process Safety Incidents") साध्य करण्यासाठी IPSW आपलें विचार आणि सतत सुधारणा करण्याची वचनबद्धता एकत्रित करण्यात मदत करेल.

आम्ही CCPS प्रोसेस सेफ्टी बीकनच्या सर्व वाचकांना आणि इतरांना या अनोख्या ऑनलाइन कार्यक्रमासाठी नोंदणी करण्याचे आवाहन करतो. या कार्यक्रमासाठी प्रवेश विनामूल्य आहे, परंतु नोंदणी आवश्यक आहे. खालील QR कोड तुम्हाला नोंदणी पृष्ठावर घेऊन जाईल. आपल्या भूतकाळातील शिकवणींचा आढावा घेण्याची आणि प्रक्रियेच्या सुरक्षिततेच्या फायद्यासाठी वचनबद्ध होऊन एकत्र काम करण्याची आपल्या सर्वांसाठी ही एक नामी संधी आहे. हा एक समान धागा आहे जो आपल्या सर्वांना शिकण्यासाठी आणि सुधारण्यासाठी प्रेरित करतो. धोकादायक ऑपरेशन्सच्या परिणामांपासून समाजाचे संरक्षण करण्यासाठी एकत्र काम करणे, पूर्वीपेक्षा आजच्या काळात अधिक महत्त्वाचे आहे.

REGISTER HERE

## आपणास ठाऊक आहे काय?

- CCPS आणि इतर प्रक्रिया सुरक्षा संस्था २ ते ६ डिसेंबर २०२४ रोजी आंतरराष्ट्रीय प्रक्रिया सुरक्षा सप्ताह (IPSW) दरम्यान शिकण्याच्या संधी उपलब्ध करून देत आहेत: www.aiche.org/ccps/ipsw
- प्रक्रियेच्या सुरक्षिततेचे महत्त्व लक्षात ठेवणे आणि प्रक्रिया सुरक्षिततेचे योग्य व्यवस्थापन न केल्यास काय होते हे जाणून घेणे हा या आठवड्याचा हेतू आहे.
- बऱ्याच कंपन्यांनी महत्त्वपूर्ण घटना अनुभवल्या आहेत कि ज्यामुळे त्यांचे ऑपरेशन्स बदलले आणि त्यांच्या संस्कृतीवर प्रभाव पडला आहे. कदाचित तुमच्या कंपनीमध्येही  यापैकी एक किंवा अधिक घटना (इव्हेंट) घडल्या असतील. तुमच्याकडेही काही धोरणे किंवा कार्यपद्धती असू शकतात ज्यांचा उद्देश अशाच घटनांची पुनरावृत्ती होण्यापासून रोखण्यासाठी आहे.
- प्रक्रिया सुरक्षा घटना सर्व आकारांच्या कंपन्यांमध्ये आणि ज्या कंपन्यांमध्ये अन्न आणि लगदा सारख्या "रासायनिक उत्पादक" मानले जात नाहीत अशा कंपन्यांमध्ये घडतात.
- घटनेच्या तपासात सिस्टीमच्या बिघाडांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे ज्यामुळे घटना घडू शकते. प्रत्येक घटनेने शिकवणी दिलेल्याआहेत की योग्यरित्या दस्तऐवजीकरण आणि अंमलबजावणी केल्यास दुसरी घटना टाळता येऊ शकते.

## आपण काय करू शकता?

- तुमच्या पर्यवेक्षकाला विचारा की तुमचे युनिट IPSW कडून कोणत्या कार्यक्रमांना उपस्थित राहतील. अनेक सादरीकरणे आठवड्याच्या कार्यक्रमांनंतर पाहण्यासाठी उपलब्ध असतील.
- तुमच्या कंपनीच्या भूतकाळात एखादी गंभीर प्रक्रिया सुरक्षा घटना असू शकते. तुमच्या पर्यवेक्षकांना किंवा काही वरिष्ठांना त्यांच्याबद्दल माहिती असल्यास त्यांना विचारा. अशा घटनांमधून मिळालेल्या शिकवणी कंपनीचे कार्य आणि संस्कृतीला आकार देतात. यांवर चर्चा केल्याने दैनंदिन कामकाजासाठी प्रक्रिया सुरक्षितता का अत्यावश्यक आहे हे अधिक दृढ होऊ शकते.
- इंटरनेटवर शोधल्यास भूतकाळातील प्रक्रिया घटना पासून मिळालेल्या शिकवणी सापडू शकतात. त्यांच्यापैकी अनेकांचा अहवाल आहे जो पुनरावलोकनासाठी उपलब्ध आहे.
- तुमच्या कंपनीत किंवा शेजारच्या कंपन्यांमध्ये घडलेल्या घटनांवर तुमचे दैनंदिन सुरक्षा संदेश केंद्रित करा.

**आमच्यात सामील व्हा आणि भविष्यातील प्रक्रियेच्या सुरक्षिततेच्या घटनांना कसे रोखायचे ते शिका.**

©AIChE 2024. All rights reserved. Reproduction for non-commercial, educational purposes is encouraged. However, reproduction for any commercial purpose without express written consent of AIChE is strictly prohibited. Contact us at ccps_beacon@aiche.org or +1 646-495-1371.